SHRI SHIVAJI EDUCATION SOCIETY AMRAVATI'S

**SHRI SHIVAJI ARTS, COMMERCE AND SCIENCE MAHAVIDYALAYA, MOTALA DIST.BULDANA**

## INTERNAL COMPLAINT COMMITTEE

**ACADEMIC YEAR- 2022 – 2023**

**जागतिक महिला दिन**

**08/03/2023**

---

# Report

श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मोताळा येथे दिन ८ मार्च रोजी " जागतिक महिला दिन" उस्फूर्तपणे साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. गजानन जाधव सर यांच्या मार्गदर्शना खाली महिला तक्रार निवारण समिती अंतर्गत 'जागतिक महिला दिन' कार्यक्रमाचे आयोजन केले होते. अध्यक्षस्थानी मा. प्राचार्य डॉ. गजानन जाधव होते. प्रमुख वक्ते व पाहुणे डॉ. सौ. छाया महाजन व सौ. राजश्री गायकवाड मॅडम होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. भाऊसाहेब, राजमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे पूजन व दिप प्रज्वलन करण्यात आले. महिला दिन महिलांच्या हक्कांच्या चळवळीचे प्रतीक असून त्यांच्या हक्कांना प्रोत्साहन देण्याच्या हेतूने हा दिवस पाळला जातो. सर्वत्र समाज उन्नती घडवून आणायची असेल तर शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, प्रशासकीय व आर्थिक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने महिलांना स्थान मिळाले पाहिजे. असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. गजानन जाधव यांनी केले.

आजही जगात महिला शिक्षण व आरोग्य संदर्भात मागासलेल्या आहेत. अलीकडे महिलांवरील हिंसाचाराच्या घटना मोठ्या प्रमाणात घडत आहेत. नोकरीमध्ये पदोन्नतीसाठी अनेक बाबींचा सामना करावा लागतो. महिलांनी त्यांच्या अधिकाराविषयी सदैव जागृत असणे गरजेचे आहे असे मत डॉ. सौ. छाया महाजन यांनी व्यक्त केले.

सौ. राजश्री गायकवाड यांनी इतिहासकालीन पराक्रमी स्त्रियांचा आदर्श आपल्याला आजच्या वर्तमानकाळातही कसा प्रेरणादायी आहे हे विविध उदाहरणे देवून सांगितले.

यावेळी संगीत खुर्ची, फॅन्सि ड्रेस स्पर्धा ई. विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. सूत्रसंचालन प्रा. डॉ. चित्रा मोरे मॅडम यांनी केले. प्रास्ताविक ICC समन्वयक प्रा. सौ. नंदा मास्कर यांनी केले व आभारप्रदर्शन डॉ. सुप्रिया बेहेरे यांनी केले. कार्यक्रमाला प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी व विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.









शिवाजी महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना महाजन.

# जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

लोकमत न्यूज नेटवर्क

**मोताळा :** श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मोताळा येथे दिनांक ८ मार्च रोजी जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गजानन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली महिला तक्रार निवारण समिती अंतर्गत जागतिक महिला दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. गजानन जाधव होते तर प्रमुख वक्ते म्हणून डॉ. छाया महाजन आणि राजश्री गायकवाड उपस्थित होत्या. समाज उन्नती घडवून आणायची असेल तर शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, प्रशासकीय व आर्थिक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने महिलांना स्थान मिळाले पाहिजे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. गजानन जाधव यांनी केले.

यावेळी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. संचालन प्रा. डॉ. चित्रा मोरे, प्रास्ताविक तक्रार निवारण समिती समन्वयक प्रा. नंदा मास्कर तर आभार भौतिक शास्त्र विभागप्रमुख डॉ. सुप्रिया बेहेरे यांनी मानले. कार्यक्रमाला प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

Mar 09, 2023
erelego.com